Shikshan Prasarak Mandal's

# GOPAL KRISHNA GOKHALE COLLEGE, KOLHAPUR.

'B' Ward, Subhash Road, Kolhapur Pin- 416 012. P. Box. No.-3
Phone No- (0231) 2642540 /2642340
NAAC Accredited "B" (C.G.P.A. 2.48) 3rd Cycle

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

E-Mail:- gkgcollege1950@gmail.com g260.cl@unishivaji.ac.in Web Site:- www.gkgcollege.edu.in
U-DISE - 27341304307

**Vice Prin. Shri. N.T.Patil**
**M. A. M.Ed.**

**I/c Prin. Dr. R. B. Bhuyekar**
**M.A., M. Phil., Ph.D.(HIndi)**

Ref. No.GKG/1681 /2025-2026 Date – 23/03/2026

## नोटीस

महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ विभागाकडील सर्व विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, रा. प. संभाजीनगर आगार व्यवस्थापक यांचे पत्र क्र.राप/आव्य/सन/वाह./2591 रा.प.संभाजीनगर दिनांक 14 मार्च, 2026 नुसार महाविद्यालयातील परगावाहून ये-जा करणा-या विद्यार्थ्यांसाठी पासमध्ये सवलत दिली जाणार आहे. तरी जे विद्यार्थी परगावाहून ये-जा करतात अशा विद्यार्थ्यांनी पास सवलत अर्ज ऑफीसमध्ये श्रीमती आर. ए. बागवान कनिष्ठ लिपीक यांचेकडून घेणेचा आहे.

G. K. GOKHALE COLLEGE KOLHAPUR

**प्राचार्य,**
**गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय**
**कोल्हापूर**

**सोबत** :- 1. बोनाफाईड सर्टिफिकेट
2. आधारकार्ड झेरॉक्स प्रत
3. आयकार्ड साईज फोटो

OPPO A78 5G

प्रति,
मा० मुख्याध्यापक/प्राचार्य

. . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . .

क्र. राप / आव्य / सन / वाह. / २५०१
रा.प. संभाजीनगर
दि. १४/03/२०२६

R.A.B
26/3/26

आगार पातळीवरील RuPay ON THE GO, enabled with NCMC कार्डची कार्यपध्दती खालील माणे-

RuPay ON THE GO, enabled with NCMC कार्डची नोंदणी- [रजिस्ट्रेशन] -

अ) अहिल्याबाई होळकर/ शालेय/महाविद्यालयीन/व्होकेशनल व इतर विद्यार्थी/ सर्व्हिस पास

I. शालेय विद्यार्थ्यासाठी - सदर कार्ड करिता प्रत्येक विद्यार्थ्याला पासासाठी करावयाचा अर्ज रु.५/- शुल्क आकारुन दिला जाईल. तो अर्ज शाळेतून भरुन आणावयाचा आहे. सदर अर्जावर सरल / PEN क्रमांकाची नोंद असणे आवश्यक आहे. अर्जावरील संपूर्ण माहिती भरून शाळेच्या मुख्याध्यापकाकडून सदर अर्ज प्रमाणित करून आणल्यानंतर आगारातील/ बसस्थानकावरील पास वितरण करणा-या वाहतूक नियंत्रक/ आगारातील अधिकृत एजंट कडे सदर अर्ज जमा करून अर्जातील नोंदी प्रमाणे सरल / PEN क्रमांकाव्दारे POS मशिन कार्यप्रणालीवर वाहतूक नियंत्रक / अधिकृत एजंट सदर विद्यार्थ्याची नोंदणी करतील. विद्यार्थ्याच्या पालकाचा / विद्यार्थ्याचा भ्रमणध्वनी क्रमांक अनिवार्य राहील. अर्जावर विद्यार्थ्यांचा फोटो असणे आवश्यक आहे. त्यानंतर पासाच्या मार्गाची संपुर्ण नोंदणी POS मशिन वर करण्यात यावी. त्यानंतर POS मशिनवर विद्यार्थ्याची संपुर्ण माहिती फोटो सहीत दिसेल. विद्यार्थ्याकडून प्रवास अंतराच्या पासाची रक्कम व कार्ड फी सह आकारावयाची रक्कम POS मशिन वर दिसेल, त्यानुसार सदरची रक्कम स्विकारण्यात यावी. POS मशिन व्दारे जनरेट झालेली पावती/रिसिप्ट विद्यार्थ्याला देण्यात यावी. नोंदणी पुर्ण झाल्यानंतर मे.ईबिक्स कंपनीकडून नोंदणी केलेले कार्ड ३० दिवसांत प्रिंट करून त्या संबधित आगारास देण्यात येईल व त्यानंतर सदर विद्यार्थ्याला POS मशिन व्दारे सदर कार्ड POS मशिन मधील Activation कार्यपध्दतीनूसार विद्यार्थ्याकडील पावती/रिसिप्ट प्रमाणे देण्यात येईल.

II. महाविद्यालयीन विद्यार्थी/ व्होकेशनल विद्यार्थी/ इतर सर्व पात्र विद्यार्थ्यांची कार्ड नोंदणी व वितरण करण्याची कार्यवाही शालेय विद्यार्थ्याप्रमाणेच असेल. मात्र त्यांची माहिती ही विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जानुसार किंवा सदर विद्यार्थ्यांकरिता सरल / PEN क्रमांकाव्दारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे भरण्यात यावी. भ्रमणध्वनी क्रमांक अनिवार्य राहील.

तरी वरील प्रमाणे सन २०२६-२७च्या शैक्षणिक सत्रापासून सवलती-करीता विद्यार्थ्यांना NCMC कार्ड देण्यात येणार आहे.

आगार व्यवस्थापक (व) वरिष्ठ
रा. प. संभाजीनगर

INWARD No. 1280
G.K. G. College, Kolhapur.
Date : 20/03/2026

OPPO A78 5G

# महाराष्ट्र राज्य परिवहन

## विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सवलतीबाबत अर्जाचा नमुना

मी ____________ खालील कारणास्तव दिनांक ____________

रोजी ____________ पासून ____________ पर्यंत प्रवास करू इच्छितो.

१) कॉलेजच्या / शाळेच्या सुट्टीमध्ये माझ्या गावी परतण्यासाठी.

२) सुट्टीनंतर कॉलेजला / शाळेला परतण्यासाठी.

३) ____________ परिक्षेला बसण्यासाठी.

४) ____________ परिक्षेनंतर परत गावी जाण्यासाठी.

५) गंभीररित्या आजारी असलेल्या माझ्या वडिलांना / आईला / माझे कुटुंबीय ____________ यांना भेटण्यासाठी (सोबत वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले आहे.)

६) मी आजारी असल्यामुळें डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार गावी जाण्यासाठी (सोबत वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले आहे.)

मी ____________ कॉलेजचा / शाळेचा विद्यार्थी आहे.

नांव ____________ वय **विद्यार्थ्याची सही**

दाखला देण्यात येता की, वर अनुक्रमांक ____________ मध्ये दिलेल्या कारणास्तव सवलतीसाठी अर्ज करणारा विद्यार्थी हा आमच्या कॉलेजचा / शाळेचा वास्तविक विद्यार्थी आहे.

दिनांक ____________

प्राचार्य / मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका

कॉलेजच्या / शाळेच्या कार्यालयाचा शिक्का

(आवश्यक नसलेला भाग खोडून टाकावा.)

कुमार / कुमारी ____________ यास वर अनुक्रमांक ____________ मध्ये दिलेल्या कारणास्तव याद्वारे बसच्या प्रवासामध्ये सवलत देण्यात येत आहे.

दिनांक ____________

____________

डेपो / व्यवस्थापक / स्थानक प्रमुख

ठिकाण ____________

टीप - १) विद्यार्थ्याला खालील अटीवर बस भाड्यामध्ये सवलत देण्यात येईल.

अ) सवलतीच्या भाड्यात प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बसगाडीमधील एकूण आसन संख्येच्या १/३ पेक्षा अधिक असता नये

ब) अर्जदाराने संबंधित शाळेचे किंवा कॉलेजचे प्रमुख आणि वैद्यक व्यवसायी यांच्याकडून आवश्यक प्रमाणपत्र दाखल केले पाहिजे.

२) प्रवास भाड्यामध्ये सवलत देण्यास अनुज्ञा दिली म्हणजे बसमध्ये जागा राखून ठेवली असे होत नाही.

३) या सवलतीचा दुरुपयोग केल्यास विद्यार्थ्यांकडून पूर्ण दराने प्रवास भाडे वसूल केले जाईल.

OPPO A78 5G